# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २१/०२/२०२२ (सोमवार)**

**(सकाळ)**

---

### जबरी संभोग

**पो.स्टे. नरखेड :–** दिनांक १८/०२/२०२२ चे सुमारास वय १९ वर्ष फिर्यादी/पीडित हि तिचे राहते घरी असतांना आरोपी नामे– राहुल घोरपडे, वय ३० वर्ष, रा. नांदा सिंदी याने पाणी पिण्याचा बहाना करून फिर्यादीचे घरात जावुन फिर्यादी पाणी आण्यास केली असता तिच्या पाठीमागे स्यंयपाक घरात जावुन बळजबरीने जबरी संभोग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम ३७६,४५१,५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री गावडे मो.क्र. ८४२४०४३१३५ हे करीत आहे.

**पो.स्टे. पारशिवनी :–** दिनांक २६/०८/२०२० ते दिनांक २७/०१/२०२२ पर्यंत वय १६ वर्षीय फिर्यादी/पीडित अल्पवयीन मुलगा हा आरोपी महिला वय २१ वर्ष हिचा नातेवाईक आहे. यातील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील अल्पवयीन मुलगा फिर्यादी हा सुट्टयामध्ये आरोपी महिला हिचे घरी गेला तेव्हा तिने त्याला एकटा पाहुन त्याचे ओठाची किस घेतली व नंतर फिर्यादी मुलगा हा आपल्या घरी गेल्यावर त्याचे मोबाईलवर वेळोवेळी फोन करून धमकी देवुन तिचे माहेरी बोलावुन त्याचे सोबत जबरीने संभोग करून फिर्यादीचे लैंगिक शोषण केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम ५०६ भादंवि. सहकलम ४, ६, ८, १०, १२ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि निशा भुते मो.क्रं. ९८२२५६६१८० या करीत आहे.

### अकस्मात मृत्यू

**पो.स्टे. नरखेड :–** अंतर्गत २० कि. मी. अंतरावरील आग्रा शिवार येथे दिनांक १७/०२/२०२२ चे १७:०० ते दिनांक ०८/०२/२०२२ चे ०६:०० वा. दरम्यान **सुरेश नामदेव वाकडे(मृतक) वय ६० वर्ष, रा. आग्रा तह. नरखेड** हे शेतात पाणी ओलुन घरी परत जात असतांना अंधार असल्याने त्यांचा तोल जावुन ते शेताचे खोल गट नाल्यात पडल्याने तोंडाचा भाग मातीत दबल्याने ते गुदमरुन मरण पावले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– अक्षय सुरेश वाकडे, वय २५ वर्ष, रा. आग्रा तह. नरखेड यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार धनराज भुक्ते मो.क्र. ९८२३६१२८५८ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर